५ दैनिक जनप्रवास सांगली
■ सोमवार, दि. २ सप्टेंबर २०१९
Website : janpravas.in

# महाडिक अभियांत्रिकी कॉलेजकडून पूरग्रस्तांच्या घराचे स्ट्रक्चरल ऑडिट

**इस्लामपूर ● प्रतिनिधी**

२००५ च्या तुलनेत २०१९ सालच्या महापुराने सर्वत्र हाहाकार माजविला. लोकांची मोठ्या प्रमाणात वित्तहानी तर झालीच, पण त्याबरोबरच त्यांना खूप मोठा मानसिक धक्का बसला. यातून सावरण्यासाठी सर्व ठिकाणांहून लोकांनी सढळ हाताने सर्वतोपरी मदत केली.

पेठ (ता.वाळवा) येथील व्यंकटेश्वरा शिक्षण संस्थेच्या नानासाहेब महाडिक कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे विद्यार्थी पुढे सरसावले आहेत. कॉलेजच्या सिव्हिल इंजनिअरिंग विभागाच्या ६० विद्यार्थ्यांनी दि.१९ ते २४ ऑगस्ट दरम्यान वारणा व कृष्णा नदी काठच्या पूरग्रस्त गावांतील इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट केले. स्ट्रक्चरल ऑडिट करत असताना कोणत्याही इमारतीचे परीक्षण करून (भिंती, कॉलम, छप्पर) ती इमारत अजून किती काळ मजबुतीने उभी राहू शकते हे ठरविले. यामध्ये वाळवा व शिराळा तालुक्यातील धोत्रेवाडी, तांबवे, कासेगाव, कोळे, नरसिंहपूर, शिरटे, शिरगाव, मर्दवाडी, कृष्णानगर, कारंदवाडी, मिरजवाडी, चिकुर्डे, देवर्डे, ऐतवडे खुर्द, कुंडलवाडी, तांदुळवाडी, कोरेगाव या गावांतील लोकांना याचा फायदा झाला. या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांनी प्रत्येक घरापर्यंत पोहोचून आपली जबाबदारी पूर्ण केली. मुलांच्या या कार्याबद्दल विविध भागांमधून मुलांचे कौतुक होत आहे व अनेक ग्रामपंचायतीत विशेष सत्कार करून आभार मानले. कृष्णा व वारणा नदीकाठच्या पूरग्रस्तांना फायदा झाला. यामुळे आपले घर किती मजबूत आहे व अजून किती काळ ते राहण्यायोग्य आहे याची लोकांना माहिती मिळाली. विद्यार्थ्यांनी पंचायत समितीच्या बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली हे ऑडिट केले.

या स्ट्रक्चरल ऑडिटमुळे (लेखा परीक्षण) पुरग्रस्तांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळाला. त्याचबरोबर व्यंकटेश्वरा शिक्षण संस्थेचे सचिव राहुल महाडिक, संचालक महेश जोशी, कॉलेजचे प्राचार्य डॉ.व्ही.ए. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी काम केले. सिव्हिल विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी संयोजन केले.